महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

दैनिक ठाणे

# जीवनदीप वार्ता

मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर

मुख्य संपादक : रवींद्र घोडविंदे

Rs.2/-

कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रवींद्र घोडविंदे (एम.डी.)

गुरुवार ■ ०३ जुलै २०२५ ■ वर्ष - सातवे ■ अंक ०१२ ■ RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024

# ठाणे जिल्ह्यात जमीन मोजणीचा नाविण्यपूर्ण उपक्रम

## जमीन मोजणीकामी भूकरमापक लाईव्ह लोकेशनचा वापर करणार

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे,दि.02 :-** जमीन मोजणी हा नागरिक तसेच शेतकरी बांधव यांच्या जिव्हाळ्याचा विषय..! जमीन मोजणी अर्ज सध्या ऑनलाईन भरण्याची सोय करून दिली असून असा अर्ज भरल्यानंतर नागरिकांना मोजणी कार्यालयाकडून आगाऊ नोटीसा दिल्या जातात. मोजणीबाबत अनेक वेळा काही अडचणी येत होत्या जसे की, भूकरमापक मोजणी दौऱ्यानुसार आगाऊ नोटीशीने कळवून मोजणी कामी जागेवर जात असतात. काही भूकरमापक हे जागेवर उशिरा पोहोचत असल्याने मोजणी अर्जदार, लगतधारक यांना काही अडचणी उद्भवत होत्या.

मोजणी अर्जदार तसेच भूकरमापक यांच्यामध्ये समन्वय राहावा तसेच भूकरमापक हे निश्चित कुठे आहेत, याबाबत स्पष्टता यावी, याकरिता मोजणीकामी भूकरमापक यांनी लाईव्ह लोकेशनचा वापर करण्याचे ठरविले आहे. जमीन मोजणी प्रक्रिया दिवसेंदिवस सोपी आणि जनताभिमुख करण्याचा अधिकारी स्तरावर देखील कसोशीने प्रयत्न केल्याने आता बहुतांश ऑनलाईन पद्धतीचा वापर सुरु झाल्याने सर्वसामान्य नागरीकांना दिलासा मिळाला आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विकसित महाराष्ट्र, ई-गव्हर्नन्स विषयक सुधारणा आणि सेवाविषयक प्रशासकीय सुधारणा या तीन बाबींवर आधारित दीडशे दिवसांचा कृती आराखडा जाहीर केला असून यामध्ये त्यांनी प्रशासकीय सुधारणांवर भर दिला आहे. त्या अनुषंगाने जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख नितीन पाटील यांच्या संकल्पनेतून आणि पुढाकारातून मोजणी प्रक्रियेमध्ये व्हॉट्सअॅप लाईव्ह लोकेशनचा वापर करून अर्जदारांना जास्तीत जास्त सुविधा कशा पुरवता येतील, या दृष्टिकोनातून जिल्ह्यातील सर्व तालुक्यांमध्ये भूकरमापक यांनी त्यांच्या मोजणी दौऱ्याप्रमाणे मोजणीस जाण्यापूर्वी त्यांचे लाईव्ह लोकेशन संबधीत अर्जदार, लगतधारक तसेच कार्यालयप्रमुख यांच्या भ्रमणध्वनीवर व कार्यालयाच्या व्हॉट्सअॅप ग्रुपवर शेअर करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

या निर्णयामुळे अर्जदार, लगतधारक यांना भूकरमापक हे मोजणी स्थानापासून किती अंतरावर आहेत व मोजणी स्थळी पोहोचण्यास किती कालावधी लागेल याबाबत ठोस माहिती तात्काळ उपलब्ध होईल. तसेच मोजणीचे थेट स्थान (लाईव्ह लोकेशन) शेअर केल्याने कार्यालयप्रमुख यांनादेखील आपले कर्मचारी मोजणी स्थानी पोहोचले आहेत किंवा नाही याबाबत माहिती मिळते व कार्यालयप्रमुख यांना अर्जदार, लगतधारक यांच्याकडून विचारणा झाल्यास त्याप्रमाणे त्यांना माहिती देण्यास सोईचे होते. यामुळे दैनंदिन माहिती मोजणी कामावर प्रभावी नियंत्रण ठेवण्यास मोलाची मदत होत आहे.

भूमी अभिलेख विभागाच्या ऑनलाईन ई-मोजणी, इप्सित पोर्टलवर ऑनलाईन फेरफार अर्ज सुविधा आणि प्रत्यय या प्रणालीद्वारे ऑनलाईन अपील अर्ज नागरिक अथवा विधीज्ञ यांना दाखल करता येतील. या आणि अशा सुविधा शासनाच्या "महाभूमी" या पोर्टलवर उपलब्ध करून दिल्या असून नागरिकांनी सर्व सुविधांचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख नितीन पाटील यांनी केले आहे.







## जीवनदीप महाविद्यालयाला जिल्हास्तरीय युवक महोत्सवाचे अजिंक्यपद

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई :** मुंबई विद्यापीठाचा युवा महोत्सव हा सगळया कॉलेज विश्वातील मोठा महोत्सव मानला जातो. मुंबई विदयापीठाच्या या ५७ व्या 'युवा महोत्सवात' जीवनदीप कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाने ( ठाणे / पालघर जिल्हा ग्रामीण झोन - VI ) जिल्हास्तरीय अजिंक्यपद ( चॅम्पियनशिप ) पटकावले आहे. वक्तृत्व, वादविवाद, प्रश्नमंजुषा, स्किट, एकपात्री अभिनय, पोस्टर मेकिंग, रांगोळी, मेहंदी अशा विविध कलाप्रकारात विद्यार्थी सहभागी झाले होते.

या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष श्री. रवींद्र घोडविंदे, महाविद्यालयाचे प्राचार्य कैलास कळकटे यांनी सांस्कृतिक विभागाचे व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## शिक्षकांचे योग्य समायोजन होणार

### - उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई, दि. २ :** राज्यातील काही भागांमध्ये विद्यार्थ्यांची संख्या घटल्यामुळे शिक्षक अतिरिक्त ठरत असून, त्या शिक्षकांचे योग्य समायोजन करण्यात येणार असल्याची माहिती उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज विधानपरिषदेत दिली. विद्यार्थी संख्या कमी झाली तरी कुठलीही शाळा बंद केली जाणार नाही, असेही उपमुख्यमंत्री शिंदे यांनी सांगितले. तसेच शासनाने कोणतीही शाळा बंद केली नसल्याची माहिती राज्यमंत्री पंकज भोयर यांनी दिली. विधानपरिषद सदस्य विक्रम काळे यांनी उपस्थित केलेल्या लक्षवेधीला उत्तर देताना उपमुख्यमंत्री श्री. शिंदे आणि राज्यमंत्री श्री. भोयर बोलत होते. यावेळी सदस्य जयंत आसगावकर, ज. मो. अभ्यंकर, अमोल मिटकरी, अभिजित वंजारी, ज्ञानेश्वर म्हात्रे, एकनाथ खडसे, शशिकांत शिंदे यांनी सहभाग घेतला.

## राष्ट्रवादीच्या सरचिटणीसपदी संजय तिवरे यांची नेमणूक



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**शहापूर, ता.2( वार्ताहर):** शहापूर तालुक्यातीलसहकार महर्षी,लोकनेते स्व.दशरथ तिवरे यांच्या जनमानसातील आदराचे स्थान लक्षात घेऊन राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे पक्षप्रमुख व उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी त्यांचे ज्येष्ठ चिरंजीव समाजसेवक संजय तिवरे यांची पत्र देऊन महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीस पदी नियुक्ती केली.यावेळी माजी मंत्री नरहरी झिरवळ, राज्यमंत्री दौलत दरोडा,आनंद परांजपे,नजीबभाई मुल्ला,आनंद ठाकूर, युवानेते राजेश तिवरे,जैतूकाका भोईर,अरुण मांजे,जयवंत भाकरे,अशोक भाकरे व प्रशांत धिरडे यांच्यासह राष्ट्रवादीचे पदाधिकारी व हितचिंतक उपस्थित होते.ह्या पदाचा उपयोग पक्षवाढीसाठी व गोरगरीब जनतेच्या अडीअडचणी सोडवण्यासाठी करणार असल्याचे यावेळी राष्ट्रवादी पक्षाचे नवनिर्वाचित सरचिटणीस संजय तिवरे यांनी सांगितले.

## पंढरपूर वारीत अर्बन नक्षलवादी?

### - आमदार मनीषा कायंदे यांचे विधासभेत आरोप



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

शिवसेनेच्या (शिंदे गट) आमदार मनीषा कायंदे यांनी पंढरपूरच्या वारीमध्ये 'अर्बन नक्षली' शिरल्याचा गंभीर आरोप केला. हा दावा केवळ ऐकीव नसून यामागे ठोस पुरावे असल्याचे त्यांनी विधानपरिषदेत सांगितले. राज्य विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात त्यांनी हे आरोप केले. त्यावर उत्तर देताना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी चौकशी करून कारवाई करण्याचे आश्वासन दिले आहे.

मनीषा कायंदे यांनी सांगितले, की "राज्यभरात अत्यंत सांप्रदायिक वातावरणात सुरू असलेल्या पंढरपूरच्या वारीमध्ये अन्य धर्मीय, नास्तिक आणि नक्षलवादाशी संबंधीत आरोप असलेले विविध लोक व 'लोकायत' सारख्या अनेक संस्थांचे लोक सहभागी होवून पथनाट्य अथवा इतर सांस्कृतिक कार्यक्रमांद्वारे संत साहित्य व संतांच्या विचारांची मोडतोड करून साध्याभोळ्या वारकऱ्यांचा बुद्धीभेद करीत असल्याचे वारकरी संस्थांचा आरोप आहे. अशा व्यक्ती व संस्थांवर शासनाने योग्य ती प्रतिबंधात्मक कारवाई करण्याची मागणी पॉइंट ऑफ इनफार्मेशनच्या माध्यमातून आज विधानपरिषद सभागृहात केली. त्यावर उत्तर देताना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी वारीचे पवित्र्य व वारकऱ्यांच्या सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य देत अश्या व्यक्ती व संस्थांची गृहविभागामार्फत तात्काळ चौकशी करून त्यांच्यावर प्रतिबंधात्मक कारवाई करण्याचे आश्वासन सभागृहाला दिले.

## प्रभाग रचनेसंदर्भात अफवा पसरविणाऱ्यांवर केडीएमसीकडून कारवाईचा इशारा

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** महाराष्ट्र शासनाकडून महानगरपालिकांचा सार्वत्रिक निवडणूका घेण्याचा कार्यक्रम निश्चित करण्यात आला नसुन, सदर निवडणूकांसाठी महापालिकांची प्रभाग रचना करण्याबाबतचे आदेश-२०२५ दि. १० जुन, २०२५ रोजी नर्गमित करण्यात आलेले आहेत. या आदेशात प्रभाग रचना करणेसंबधात मार्गदर्शक तत्वे व नियम निश्चित केलेली नाहेत. तसेच दि. २३ जुन, २०२५ रोजी प्रभाग रचना करणेबाबत शासनाने सुधारीत कालबध्द कार्यक्रम आखून दिलेला आहे.

त्यानुसार महापालिका स्तरावर दिनांक ३१ जुलै, २०२५ पावेतो प्रारुप प्रभाग रचना मसुदा तयार करावयाचा असुन, राज्य शासनाकडे मान्यतेसाठी सादर करावयाचा आहे. सदर प्रारुप प्रभाग रचनेस मा. राज्य निवडणूक आयोगाची नान्यता मिळाल्यानंतर त्यास जाहिररित्या प्रसिध्दी दयावयाची असुन, नागरीकांच्या हरकती/सूचना दिनांक २२ ते २८ ऑगस्ट, २०२५ च्या दरम्यान मागविणेत येणार आहेत. त्यासाठी शासन राजपत्र, राज्यस्तरीय वर्तमानपत्र, महाराष्ट्र शासन व महापालिकेच्या अधिकृत वेबसाईट आणि महापालिका कार्यालयाच्या नोटीसबोर्डवर प्रसिध्दी दिली जाणार आहे. या कालावधीत आलेल्या हरकती/सूचनांवर शासनाकडून नियुक्त केलेल्या प्राधिकृत अधिकारी यांचेकडून सुनावणी घेण्यात

येणार आहे. हरकती/सुचना वरील शिफारशी विचारात घेऊनच मा. निवडणूक आयोगाच्या मान्यतेने प्रभाग रचना अतिंम केली जाणार असून, त्यासही व्यापक प्रसिध्द देण्यात येणार आहे.

उपरोक्त नमुद केल्याप्रमाण मा. शासनाच्या आदेशानुसार प्रारुप प्रभाग रचना तयार करणेची कार्यवाही अत्यंत गोपनीयरित्या कल्याण डोंबिवली महापालिकेमार्फत सुरु आहे. त्यामुळे कल्याण डोंबिवली महानगर पालिकेक्कडून अदयाप कोणतीही प्रारुप प्रभाग रचना प्रसिध्द करणेत आलेली नाही. तथापी काही समाज घटकांकडून विविध समाज माध्यमांद्वारे कल्याण डोंबिवली महानगरपालिका, सार्वत्रिक निवडणुक संभाव्य प्रभाग रचना असा मजकूर प्रसारीत करण्यात आला आहे. त्यामुळे महापालिका क्षेत्रातील सुजाण नागरीकांमध्ये अफवा/गैरसमज पसरविले जात आहेत.

दरम्यान, प्रसारीत झालेला मजकूर हा पूर्णतः खोटा असुन, त्याचा महापालिकेशी काहीही सबंध नाही. त्यावर नागरीकांनी विश्वास ठेऊ नये. असे महापालिका प्रशासनाकडून अधिकृतरित्या स्पष्ट करणेत येत असून समाज माध्यमाद्वारे अथवा इतर मार्गाने कल्याण डोंबिवली महानगरपालिका आगामी सार्वत्रिक निवडणुक तसेच प्रभाग रचनेसंदर्भात अफवा पसरविणाऱ्या विरुध्द कायद्यातील तरतूदी व भारतीय दंड संहितेच्या कलमान्वये कारवाई करण्यात येईल, अशी माहिती उप आयुक्त रमेश मिसळ यांनी दिली आहे.

## कल्याण तालुक्याच्या ग्रामीण भागात भाड्याच्या गाळ्यांत अनधिकृत शाळा?

### गट शिक्षण अधिकाऱ्यांचे लक्ष आहे तरी कुठे ?

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** कल्याण तालुक्याच्या ग्रामीण भागात अनेक ठिकाणी भाड्याने गाळे घेऊन त्या ठिकाणी शाळा सुरू करण्यात आल्या आहेत. काही शाळा चालकांनी बालवाडीच्या नावाखाली इयत्ता पहिली ते दहावीचे वर्ग सुरू केले आहेत. या अनधिकृत शाळांच्या माध्यमातून विद्यार्थी, पालकांची फसवणूक होत आहे. त्यामुळे ठाणे जिल्हा परिषद, पंचायत समिती विभागाने अशा अनधिकृत शाळा शोधून त्यांच्यावर तातडीने कारवाई करून फौजदारी गुन्हे दाखल करावेत, अशी मागणी डोंबिवली जवळील निळजे येथील संकल्प बहुद्देशीय सामाजिक संस्थेचे सचिव महेंद्र पाटील यांनी कल्याण पंचायत समितीच्या गट शिक्षणाधिकारी रूपाली खोमणे यांच्याकडे केली आहे.

आपल्या गावात, घराजवळ शाळा सुरू झाली आहे म्हणून पालक आपल्या पाल्याला या जवळच्या शाळेत प्रवेश घेत आहेत. शाळा चालकांकडे ही शाळा शासन मान्यता किंवा अधिकृत आहे की नाही याची विचारणा पालक करत नाहीत. एखाद्या पालकाने विचारणा केली तर शासन शिक्क्याचा एखादा किरकोळ कागद दाखविला जातो. आपली शाळा कशी शासन मान्य आहे, असे भासवले जाते. या सर्व प्रक्रियेतून विद्यार्थ्यांचे अतोनात नुकसान होत आहे.

यामधील काही अनधिकृत शाळांना काही राजकीय मंडळींचे, काही अधिकाऱ्यांचे पाठबळ असल्याचा ठपका पाटील यांनी ठेवला आहे. शासनाच्या काही धोरणांमुळे एखादा विद्यार्थी अधिकृत शाळेत शिकलेला नसला तरी त्याला वयाच्या प्रमाणपत्राच्या आधारे इयत्ता दहावीच्या परीक्षेसाठी प्रवेश मिळतो. असे विद्यार्थी बहिस्थ विद्यार्थी म्हणून महाराष्ट्र राज्य परीक्षा मंडळाची परीक्षा देतात. या शासन नियमाचा दुरूपयोग करून अनेक शाळा चालकांनी अनधिकृत शाळा सुरू केल्या आहेत.









## वाचक मनोगत

### वर्षा सहलीचा आनंद लुटा पण...

राज्यात सर्वदूर पाऊस पडत आहे. काही ठिकाणी संततधार तर काही ठिकाणी मुसळधार पाऊस कोसळत आहे त्यामुळे वातावरण प्रफुल्लित झाले असून परिसर हिरवाईने नटला आहे. नद्या दुथडी भरून वाहत आहेत. तलाव विहिरीही भरल्या आहेत. धबधबे कोसळत आहेत. शेतशिवाराने हिरवा शालू नेसल्याने सर्वत्र आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. डोंगर दऱ्यातून फेसाळणारे धबधबे अनेकांना आकर्षित करत आहेत. विशेषतः तरुणांना या निसर्ग सौंदर्याचे आकर्षण जास्त आहे. त्यातही शहरात राहणाऱ्या वर्गाला निसर्गाचे जास्त कौतुक असते कारण त्यांना निसर्गाचा जास्त सहवास लाभत नसतो. अशी मंडळी निसर्गाची नवलाई अनुभवायला पावसाळ्यात आवर्जून घराबाहेर पडतात. वर्षा सहलीचे आयोजन करतात. वर्षा सहलीचा आणि पावसाळ्यातील निसर्ग सौंदर्याचा अनुभव घेत असताना काही पर्यटकांना उत्साहाचे भान राहत नाही. विशेषतः तरुण वर्ग अतिउत्साहाच्या भरात नको ते धाडस करतात आणि त्यातून एखादी मोठी दुर्घटना घडते. अशीच एक मोठी दुर्घटना मागील वर्षी लोणावळ्यात घडली होती. या दुर्घटनेचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला होता. याआधीही अशा अनेक दुर्घटना घडल्या आहेत आणि यापुढेही घडणार आहेत कारण वर्षा सहलीसाठी आलेले पर्यटक शिस्तीचे पालन न करता नको ते धाडस करतात विशेषतः तरुण वर्ग सेल्फी काढताना, रिल बनवताना स्वतःचा जीव धोक्यात घालतात. वर्षा सहलीचा आणि पावसाळ्यातील निसर्ग सौंदर्याचा अनुभव घेत असताना काही गोष्टींची खबरदारी घेण्याची गरज आहे. सध्या कुठेही गेल्यावर सेल्फी घेणे, व्हिडीओ बनवले, रील बनवणे, फेसबूक लाईव्ह करणे हा ट्रेंड झाला आहे. या ट्रेंडच्या नावाखाली अनेकदा उंच डोंगरावरुन, घाट माथ्यावरून, धबधब्याच्या टोकावरून, चारचाकी गाडीच्या टफावरून किंवा खिडकीतून तोंड बाहेर काढून, दुचाकी वरून स्टंट करुन व्हिडीओ बनवले जातात. सेल्फी काढले जातात, रिल बनवले जातात मात्र पावसाळ्याच्या दिवसात हे प्रकार जीवावर बेतू शकतात. लाईक, शेअर आणि कमेंटच्या नादात तरुणवर्ग हे धाडस करतात मात्र हेच धाडस मोठ्या दुर्घटनेस निमंत्रण देणारे ठरते. पावसाळ्यात रस्ते अधिक घसरट झालेले असतात. खड्डयांमध्ये पाणी साचल्यामुळे खड्डा किती मोठा आहे याचा नेमका अंदाज येत नाही. काहीतरी थ्रिलिंग करण्याच्या नादात शरीराला इजा करून घेणे योग्य नाही. नदी, तलाव, धरणे, धबधबे याठिकाणी सहलीस गेल्यावर तर अधिक दक्ष राहावे लागतात कारण तिथे एखादी छोटी चूकही जीवघेणी ठरु शकते. अशा ठिकाणी मुसळधार पावसात जाणे तर चुकीचेच असते. त्याचप्रमाणे गड, किल्ले, डोंगरमाथ्यावर भटकताना देखील भान ठेवणे तितकेच गरजेचे असते. अशा ठिकाणी जोराचा पाऊस आला तर कोणती खबरदारी घ्यावी तसेच अशावेळी कोणत्याही प्रकारचा अपघात होऊ नये याची कोणतीही तजवीज केलेली नसते. त्यात काही महाभाग अशा ठिकाणी मद्यपान करून पर्यटनाला जातात. तरुणांनी हे कटाक्षाने टाळले पाहिजे. पर्यटकांनी स्वतःची व स्वतः बरोबर आलेल्यांचीही काळजी घेतली पाहिजे. वर्षा सहलीचा मनमुराद आनंद लुटा, मजा करा पण ही मजा जीवावर बेतणार नाही याचीही काळजी घ्या.

**श्याम ठाणेदार**

# विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाचे संक्षिप्त समालोचन

## अंमलीपदार्थ तस्करी संदर्भात कायद्यात सुधारणा

### – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई दि.२ : 'एनडीपीएस'अंतर्गत अटक झालेल्या आरोपींना जामीन मिळाल्यानंतर त्यांनी पुन्हा गुन्हे केल्याचे सिद्ध झाल्यास आता संघटित गुन्हेगारीअंतर्गत त्यांच्यावर 'मकोका' अंतर्गत कारवाई करण्यासाठी कायद्यात सुधारणा या अधिवेशनातच केली जाईल, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानपरिषदेत प्रश्नोत्तराच्या तासात दिली.

विधान परिषद सदस्य डॉ.परिणय फुके, एकनाथ खडसे यांनी ड्रग तस्करी संदर्भात प्रश्न विचारला होता, त्यास मुख्यमंत्र्यांनी उत्तर दिले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले की, राज्यात प्रत्येक पोलीस ठाण्यात स्वतंत्र एनडीपीएस युनिट स्थापन करण्यात आले असून त्यात अधिकारी व अंमलदारांची नियुक्तीही केली आहे. जिल्हा स्तरावर समन्वय समित्याही स्थापन करण्यात आल्या आहे. यात गेल्या दोन-अडीच वर्षांत मोठ्या प्रमाणात कारवाई करण्यात आली आहे, असेही ते म्हणाले. मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले की, केंद्र सरकारच्या मदतीने आता राज्यस्तरीय आणि आंतरराज्यीय समन्वय अधिक प्रभावी झाला आहे. सर्व राज्यांमध्ये 'इंटेलिजन्स' शेअरिंग सुरू असून त्यामुळे तस्करांवर एकत्रितपणे कारवाई शक्य झाली असल्याचेही त्यांनी सांगितले. व्यसनमुक्तीसाठीची केंद्रे महत्त्वाची असून सध्या त्यांची संख्या आणि गुणवत्ता वाढविण्यासाठी योग्य धोरण तयार करून दर्जेदार व्यसनमुक्ती केंद्रांची उभारणी केली जाणार आहे.




## एसटी कर्मचाऱ्यांच्या आरोग्य चाचण्या विशिष्ट ठिकाणी करण्याची सक्ती नाही

### – परिवहन मंत्री प्रताप सरनाईक

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई, दि.२ :** महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (एस. टी.) कर्मचाऱ्यांच्या आरोग्य चाचण्या करण्यासाठी धर्मवीर आनंद दिघे आरोग्य तपासणी योजना सुरू आहे. या योजनेत गुरुकृपा हॉस्पिटल अथवा अन्य कोणत्याही विशिष्ट हॉस्पिटल अथवा संस्थेमार्फत वैद्यकीय तपासण्या करण्यासाठी सक्ती करण्यात आलेली नाही. कुणी असा दबाव आणत असल्यास त्याबाबत चौकशी करण्यात येईल आणि त्यात कुणी दोषी आढळल्यास त्यावर कारवाई केली जाईल, असे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी विधान परिषदेत सांगितले. विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी या अनुषंगाने प्रश्न विचारला होता. या अनुषंगाने झालेल्या चर्चेत सदस्य सर्वश्री भाई जगताप, प्रवीण दरेकर, ॲड. अनिल परब आदींनी सहभाग घेतला.

## बांधावर शेतमाल खरेदी करणाऱ्या व्यापाऱ्यांना बाजार समितीचा परवाना बंधनकारक – पणन मंत्री जयकुमार रावल

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई, दि. २ :** बांधावर जाऊन शेतमाल खरेदी करणे अडचणीचे होत आहे. यामधून शेतकऱ्यांची फसवणूक झाल्याचे प्रकार राज्यात निदर्शनास येत आहेत. त्यामुळे यापुढे बांधावर जाऊन शेतमाल खरेदी करणाऱ्या व्यापाऱ्यांना संबंधित कृषी उत्पन्न बाजार समितीचा परवाना बंधनकारक करण्यात येणार आहे. परवाना असलेल्या व्यापाऱ्यांनाच संबंधित कृषी उत्पन्न बाजार समितीच्या क्षेत्रात बांधावर जाऊन शेतमाल खरेदीची परवानगी देण्यात येईल, असे पणन मंत्री जयकुमार रावल यांनी विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासात सांगितले. याबाबत सदस्य दौलत दरोडा यांनी प्रश्न उपस्थित केला होता.

या प्रश्नाच्या उत्तरात अधिक माहिती देताना मंत्री श्री. रावल म्हणाले, अकोला जिल्ह्यातील अंदुरा ॲग्रो प्रोड्यूसर कंपनीने (ता. बाळापूर) शेतकऱ्यांचा सोयाबीन शेतमाल खरेदी केला. खरेदी केलेला शेतमाल वखार महामंडळाच्या गोदामात ठेवण्यात आला. वखार महामंडळाच्या गोदामातील पावत्या आणि खरेदी केलेल्या शेतमालामध्ये १,२९७ क्विंटलची तफावत आढळून आली आहे. याबाबत कंपनीचे मालक व अन्य ११ लोकांवरती गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या तफावतीचे पैसे शेतकऱ्यांना देण्यासाठी कंपनीचा बाजार समितीकडून देय असलेला ३६ लाख रुपयांचा निधी अडकविण्यात आला आहे. शेतकऱ्यांचे पैसे तातडीने देण्यासाठी वसुलीची कार्यवाही करण्यात येत आहे.

# चिखलाने बरबटलेल्या रस्त्याने घेतला तरुणाचा बळी !

## कल्याण मुरबाड महामार्गाच्या काँक्रीटीकरणाचा नियोजनशून्य कारभार

### ठेकेदावर सदोष मनुष्य वधाचा गुन्हा दाखल करण्याची मागणी !



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुरबाड :: दिलीप पवार**

कल्याण मुरबाड रस्त्यावर गेल्या वर्षभरापासून काँक्रीटीकरणाचे काम सुरू आहे, यासाठी ठिकठिकाणी महामार्ग खोदण्यात आला आहे. पावसामुळे या रस्त्यावर चिखलाचा राडारोडा पसरला असून वाहन चालकांना वाहन चालवणे मुश्किल झाले आहे बुधवारी सकाळी २ जून या रस्त्यावर हिंदू सेवा संघाच्या जवळ चिखल मिश्रित रस्त्याने एका तरुणाचा बळी घेतला आहे

कल्याण मुरबाड रस्त्यावर हिंदू सेवा संघ फाट्या जवळ एक मोटर सायकल चिखलावरून घसरली व पाठीमागून येणाऱ्या डंपरचे चाक या मोटरसायकल स्वाराच्या डोक्यावरून गेल्याने तरुणाचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे . या रस्त्याच्या कामाबाबत लोकप्रतिनिधी लक्ष घालत नसल्याने कंत्राटदार मुजोरी वाढली आहे, वाहनांसाठी चांगल्या प्रकारचा पर्यायी रस्ता उपलब्ध करून न देताच रस्त्याचे काम सुरू असल्याने अनेक लोक अपघातात जखमी होत आहेत ,तर आज एका दुचाकी स्वाराचा मृत्यू झाल्याने कल्याण मुरबाड प्रवास करणाऱ्या लोकांमध्ये संताप व्यक्त करण्यात येत आहे. मुरबाड कल्याण रस्त्यावर वाहनांची एक प्रकारे घसरगुंडी झाली आहे राष्ट्रीय महामार्ग विभागाचे अधिकारी व संबंधित कंत्राटदार यांनी रस्त्यावरून चिखल हटवण्याचे काम केले नाही त्यामुळे एका तरुणाचा नाहक बळी गेला आहे, यामुळे लोकांमध्ये संतापाचे वातावरण आहे

कल्याण मुरबाड माळशेज घाट महामार्गाच्या पाचवा मैल ते मुरबाड रस्त्याचे चौपदरीकरण व सिमेंट काँक्रिटीकरण करण्याचे काम सुरू आहे त्यामुळे या रस्त्यावर ठीक ठिकाणी खोदकाम करण्यात आले आहे. सध्या सुरू असलेल्या पावसाने या रस्त्यावर चिखल साठला आहे या चिखलातून वाहन चालवणे अत्यंत कठीण असून दुचाकी व चार चाकी वाहनचालक कसरत करून प्रवास करीत आहेत. या रस्त्यावर सर्वाधिक त्रास दुचाकी स्वार व रिक्षाचालक यांना होत आहे.

**गेल्या दोन वर्षांपासून प्रवासी मुरबाड कल्याण रस्त्याच्या कामाचा त्रास सहन करीत आहेत. अनेक ठिकाणी गुडघाभर चिखल तयार झाला आहे. या सर्वाला ठेकेदाराचा निष्काळजीपणा जबाबदार आहे. सुरक्षिततेच्या उपाययोजनां अभावी निष्पाप दुचाकीस्वाराला आपला जीव गमवावा लागला आहे. याप्रकरणी ठेकेदारावर फौजदारी कारवाई करून मृताच्या नातेवाईकांना लवकरात लवकर नुकसानभरपाई द्यावी, तसेच पुन्हा यामार्गे कोणा निष्पापाचा बळी जाणार नाही, यासाठी त्वरित उपाययोजना करावी अशी मागणी जोर धरू लागली आहे.**

# शांतीदूत सोसायटीची कार्यकारिणी बरखास्त करण्यास एसआरएची स्थगिती!

## माजी आमदार नरेंद्र पवार यांच्या पाठपुराव्याला यश

शहापूर ग्रामिण

**:: नरेंद्र पाटील**

कल्याण पश्चिमेत गेल्या १४ वर्षांपासून रखडलेल्या शांतीदूत सहकारी गृहनिर्माण सोसायटीची सध्याची कार्यकारिणी बरखास्त करण्याच्या म्हाडाच्या निर्णयाला एस.आर. ए अर्थातच झोपडपट्टी पुनर्विकास प्राधिकरणाने स्थगिती दिली आहे. म्हाडा उपनिबंधकांनी बिल्डरच्या संगनमताने बरखास्तीचा निर्णय दिल्याचे सांगत सध्याच्या कार्यकारिणीने त्या विरोधात एस.आर.ए.कडे स्थगिती मिळवण्यासाठी अर्ज दाखल केला होता.

ज्यावर सुनावणी होऊन एस.आर.ए.ने म्हाडाच्या या निर्णयाला स्थगिती दिल्याची माहिती याप्रकरणी शासन स्तरावर पाठपुरावा करणारे माजी आमदार नरेंद्र पवार यांनी दिली आहे.

या शांतीदूत गृहनिर्माण हौसिंग सोसायटीतील १२ पदाधिकारी - सदस्यांना म्हाडाच्या उपनिबंधकांनी व्यवस्थापन समिती सदस्य पदावर राहण्यास पाच वर्षांसाठी अपात्र ठरवण्याचा आणि या संस्थेवर संजय आडारकर यांना प्राधिकृत अधिकारी म्हणून नियुक्त करण्याचा आदेश २ जून २०२५ रोजी दिला होता. या निर्णयाविरोधात सध्याच्या कार्यकारिणी समितीने एस.आर.ए.




कडे अर्ज दाखल केला होता.

त्यावर झालेल्या सुनावणीदरम्यान संजय आडारकर यांनी या संस्थेच्या कामकाजाचा पदभार घेतल्यास अर्जदारांचे भरून न येणारे नुकसान होऊ शकते. मात्र प्रतिवादी यांचे कोणतेही नुकसान संभवत नाही. त्यामुळे म्हाडाच्या निर्णयाला स्थगिती देण्याचा कार्यकारिणीचा युक्तिवाद मान्य करणे योग्य असल्याचे अनुमान एस.आर. ए सहनिबंधकांनी यावेळी नोंदवले.

तसेच अर्जदारांच्या व्यवस्थापन समितीने एकूण १८४ सभासद असलेल्य संस्थेच्या पुनर्विकासासाठी दि. २४/११/२०१३ रोजीच्या सर्वसाधारण सभेत ठरावाने विकासकाची नियुक्ती केली आहे. मात्र, या विकासकांनी समाधानकारक रित्या काम केले नाही. आणि संस्थेच्या मालमत्तेच्या तारणावर रू. ३२५ कोटींचे कर्ज घेतल्याचेही या सभासदांनी एस आर ए सह निबंधकांच्या निदर्शनास आणून दिले. त्याशिवाय सन २०१७ पासून या विकासकाकडे संस्थेच्या सभासद घरभाडयापोटी रू. १० कोटी 4 लाख एवढी रक्कम थकीत आहे. या सगळ्यासंदर्भात विकासकांविरूध्द संस्थेने दाखल केलेल्या विविध तक्रारी आणि दाव्यांमध्ये या संस्थेच्या वतीने प्रतिनिधित्व करणे आवश्यक आहे. अन्यथा संस्था आणि सभासद यांचे कधीही भरून न येणारे नुकसान होऊ शकते असेही यावेळी सांगण्यात आले.

तर तक्रार अर्जदार बागवे हे संस्थेचे तत्कालीन सचिव असतांना त्यांनी संस्थेच्या सर्वसाधारण सभेची मान्यता न घेता अनेक कागदपत्रे स्वाक्षरी करून विकासकांच्या लाभात दिले आहेत, ना-हरकत पत्रे अधिकारदेखील विकासक आणि वित्तीय संस्थाना दिले असल्याचेही यावेळी समिती सदस्यांनी सह निबंधकांच्या समोर मांडले. त्यावर या सर्व गोष्टी लक्षात घेता वैयक्तिक स्वार्थामुळे सोसायटी कमिटीला बरखास्त करण्याचा बागवे यांचा हेतु असून संस्था आणि सभासदांच्या हितासाठी त्यांचा विरोध अमान्य करून अर्जदारांची स्थगितीची विनंती मान्य करणे आवश्यक ठरते असे म्हणण्यास वाव असल्याचे निरीक्षण एसआरए सह निबंधकांनी नोंदवले. तसेच या सर्व पार्श्वभूमीवर अर्जदार आणि प्रतिवादीच्या युक्तिवादांची शहानिशा करणे शक्य व्हावे, संस्थेच्या दैनंदिन कामकाजात अडचणी निर्माण न होण्यासाठी तसेच संस्थेच्या वतीने विविध ठिकाणी विकासकांविरूध्द दाखल दावे - तक्रारीत संस्थेची बाजु प्रभावीपणे मांडली जावी यासाठी अर्जदारांचा स्थगिती अर्ज मान्य करणे न्यायोचित ठरते असे मत सहनिबंधक, झोपडपट्टी पुंरविकास प्राधिकरण नोंदवत सध्याच्या कार्यकारिणी बरखास्ती निर्णयाला स्थगिती देण्यात आल्याची माहिती माजी आमदार नरेंद्र पवार यांनी दिली आहे. दरम्यान एसआरए सह निबंधकांच्या या निर्णयाचे शांतीदूत गृहनिर्माण हौसिंग सोसायटीच्या कमिटीने स्वागत केले आहे.

# आगामी गणेशोत्सवाच्या नियोजनासाठी भिवंडी पालिका आयुक्तांची आढावा बैठक

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवडी :** पुढील महिन्यात सुरु होणा-या गणेशोत्सवाच्या पार्श्वभुमीवर आज दि.०२/०७/२०२५ रोजी भिवंडी महापालिका आयुक्त तथा प्रशासक अनमोल सागर यांनी सर्व संबंधित अधिका-यांची बैठक घेतली. या बैठकीमध्ये जनहित याचिका क्र.९६/२०२४ वर मा. उच्च न्यायालयाचे आदेश तसेच केंद्रीय प्रदुषण नियंत्रण मंडळाच्या दि.१२/०५/२०२० च्या मार्गदर्शक सूचनांनुसार करावयाच्या कारवाईबाबत आढावा घेतला. केंद्रीय प्रदुषण नियंत्रण मंडळाने त्यांच्या दि.१२/०५/२०२० च्या मार्गदर्शन सुचनांमध्ये गणेशमुर्ती ह्या पर्यावरण पुरक असाव्यात, तसेच त्यांचे विसर्जन कृत्रीम तलावात करावे असे निर्देशत केले आहे. तसेच शहरातील गणेश मूर्तीकारांना शाडूची माती उपलब्ध करुन देण्याबाबतच्या



कार्यवाहीचा देखील आढावा घेतला. केंद्रीय प्रदुषण नियंत्रण मंडळांच्या सूचनांनुसार पर्यावरण व बांधकाम विभागाने गणेश घाटांजवळ कृत्रीम तलाव उभारुन, त्या तलावांमध्ये गणेश मुर्तीचे विसर्जनाची सोय करावी असे आदेश दिले. तसेच जनसंपर्क अधिकारी यांनी मा. उच्च न्यायालय व केंद्रीय प्रदुषण नियंत्रण मंडळांच्या सुचनेनुसार नागरिकांमध्ये जनजागृती करुन त्यांना कृत्रीम तलावामध्ये गणेशमूर्ती विसर्जनास प्रोत्साहीत करावे असे निर्देश दिले. तसेच सर्व प्रभाग अधिका-यांनी त्यांच्या प्रभागात उभारावयाच्या कृत्रीम तलावांची संख्या व ठिकाणे निश्चित करुन २ दिवसात उप-आयुक्तांकडे अहवाल सादर करण्याच्या सुचना दिल्या.गणेश आगमन व विसर्जन रस्त्याची दुरुस्ती, त्या मार्गावर पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, पर्यावरण विभागामार्फत निर्माल्य एकत्रीत करुन त्याची शस्त्रोक्त पध्दतीने विल्हेवाट लावणे, याबाबत निर्देश दिले. शहरातील नागरीकांनी देखील मा. उच्च न्यायालय व केंद्रीय प्रदुषण नियंत्रण मंडळांच्या सुचनांचे पालन करुन जास्तीत जास्त पर्यावरण पुरक गणेशोत्सव साजरा करावा. गणेश मुर्तीचे विसर्जन कृत्रीम तलावातच करावे असे आवाहन मा प्रशासक तथा आयुक्त श्री. अनमोल सागर यांनी केले.या बैठकीस मा. उप-आयुक्त (मुख्यालय) श्री. विक्रम दराडे, उप-आयुक्त (कर) श्री. बाळकृष्ण क्षिरसागर, मुख्य लेखा व वित्त अधिकारी श्री. रामप्रसाद सोळुंके, मा. सहा-आयुक्त (आरोग्य) श्री. शैलेश दोंदे, सहा. आयुक्त श्री. नितिन पाटील, सहा. आयुक्त (प्रशासन) श्री. अजित महाडीक, अति. शहर अभियंता श्री. सचिन नाईक, अग्निशम अधिकारी राजेश पवार, कार्य. अभियंता (पा.पु) श्री. संदिप पटनावर, कार्य. अभियंता (विद्युत) श्री. सिध्दीक काझी, प्रभाग अधिकारी मकसूद शेख, माणिक जाधव, सुरेंद्र भोईर, गिरीश घोष्टेकर, बाळाराम जाधव व विभाग प्रमुख उपस्थित होते.

# पत्रकार विनोद कथोरे यांचे निधन



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**● राजेश दळवी**

**पडघा दि.२ :** भिवंडी तालुक्यातील पडघा नजीकच्या शेरेकर पाडा येथे राहणारे पत्रकार विनोद कथोरे यांचे दुःखद निधन झाल्याने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. सर्वाना सुपरिचित व शेरेकरपाडा येथील भुमीपुत्र असलेले पत्रकार विनोद बबन कथोरे ( ४५) यांचे हृदय विकाराच्या तीव्र झटक्याने मंगळवारी शेरेकर पाडा येथील राहत्या घरी निधन झाले असुन त्यांच्या पश्चात आई, पत्नी, २ मुले,१ मुलगी असा परिवार असुन त्यांच्या निधनाने सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे. पत्रकार विनोद कथोरे यांनी युट्युब न्युज चॅनेलच्या माध्यमातून विविध विषयाला हात घालून आपल्या पत्रकारितेमधून अन्यायाला वाचा फोडण्याचे काम ते करीत होते. तसेच अल्पावधीतच सडेतोड, निर्भीड पत्रकार म्हणून त्यांनी सर्वाची वाहवाह मिळवली होती. अत्यंत शोकाकुल वातावरणात शेरेकरपाडा येथील स्मशानभूमीत बुधवारी त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले यावेळी त्यांच्या अंत्यविधीसाठी विविध क्षेत्रातील नागरिकांसह मोठा जनसमुदाय उपस्थित होता.



गुरूवार

03 जुलै २०२५

**मेष**
नवीन वाहन खरेदी करण्याचा निर्णय घ्याल. आज तुमचा दिवस आनंदाने भरलेला जाणार आहे.

**वृषभ**
तुमचे मित्र तुम्हाला मदतीसाठी विचारतील, तुम्ही त्यांना निराश करणार नाही.

**मिथुन**
व्यवसाय करणाऱ्या लोकांना चांगला नफा मिळेल. आज तुम्ही महत्त्वाच्या बैठकीला जाल.

**कर्क**
वडिलांचा सल्ला तुम्हाला तुमच्या व्यवसायात मदत करेल. गरजू व्यक्तीला मदत कराल.

**सिंह**
दिवस तुमच्यासाठी चांगला जाणार आहे. घर खरेदी करण्याचा विचार करणाऱ्या लोकांसाठी दिवस शुभ

**कन्या**
व्यवसाय करणाऱ्या लोकांचा व्यवसाय चांगला होईल. तुमच्या प्रियकरासाठी दिवस चांगला

**तूळ**
तुमच्या प्रियकरासाठी दिवस चांगला आहे. तुमचे आरोग्य चांगले राहील.

**वृश्चिक**
काम कमीत कमी वेळेत पूर्ण करण्याचा प्रयत्न कराल. जबाबदाऱ्या चांगल्या प्रकारे पार पाडाल.

**धनु**
विद्यार्थ्यांसाठी दिवस चांगला आहे.आज तुमच्या घरी लहान पाहुणे येण्याची शक्यता आहे.

**मकर**
संपत्तीत वाढ होईल. आज तुमच्या दिवसाची सुरुवात चांगल्या मूडने होणार आहे.

**कुम्भ**
महिलांसाठी दिवस उत्तम राहील. व्यावसायिक महत्त्वाच्या बैठकीला उपस्थित राहू शकतात.

**मीन**
आज तुमचा दिवस संमिश्र जाईल. एकाग्र चित्ताने केलेले काम फायदेशीर ठरेल.

## 3 जुलै दिनविशेष

१८५२ : महात्मा फुले यांनी दलित मुलांसाठी पहिली शाळा काढली.

२००१ : सुधीर फडकेंना लता मंगेशकर पुरस्कार जाहीर.

२००० : विक्रांत या विमानवाहू युद्धनौकेचे मुंबईच्या समुद्रात सागरी संग्रहालयात रूपांतरास मान्यता.

१९९८ : कवी प्रदीप - यांना दादासाहेब फाळके पुरस्कार जाहीर.

१८५५ : भारत कायदे शिक्षणाचा प्रारंभ



# वसई विरार मनपाच्या आरोग्य विभागाला बनावट औषध पुरवठा

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**वसई:** वसई विरार शहर पालिकेच्या आरोग्य विभागाला बनावट औषधांचा पुरवठा होत असल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. अन्न औषध प्रशासनाच्या अधिकाऱ्यांनी महापालिकेच्या सातिवली येथील माता बाल संगोपन केंद्रातील औषधांची नमुने तपासणी केली असता. त्यात बनावट औषध गोळ्यांचा पुरवठा होत असल्याचे उघड झाले आहे. याप्रकरणी वालीव पोलीस ठाण्यात पुरवठादारांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

वसई विरार महापालिकेच्या आरोग्य विभागाकडून शहरातील नागरिकांना मोफत आरोग्य सेवा पुरविली जाते. पालिकेने आरोग्य विभागाला औषध पुरवठा करण्यासाठी पुरवठादार नियुक्त केले असून त्यांच्या मार्फत पालिकेची रुग्णालये, आरोग्य केंद्र, माताबाल संगोपन केंद्र अशा ठिकाणी औषधांचा पुरवठा केला जातो.

नुकताच वसई पूर्वेच्या सातीवली येथील माताबाल संगोपन केंद्रात पुरवठा करण्यात येणाऱ्या काही औषधांचे १० अनौपचारिक नमुने अन्न औषध प्रशासनाने तपासणीसाठी घेतले होते. ह्या तपासणी दरम्यान त्या औषधामध्ये बनावट असल्याचे आढळून आल्याचे अन्न औषध प्रशासनाच्या अधिकाऱ्यांनी सांगितले आहे. यात ज्यांनी औषध पुरवठा केला अशा पुरवठा दारांची चौकशी केली होती. यात त्यांना ज्या भागातून औषध साठा खरेदी विक्री केला यांची माहिती मागविण्यात आली होती. मात्र त्यांची योग्य ती माहिती त्यांच्या मार्फत आली नसल्याने औषध पुरवठादार मे प्रणिक एंटरप्राइजेस व अन्य सहा पुरवठादार यांच्या विरुद्ध भारतीय न्याय दंड संहिता कलम ३१८(४), ३३६(३), ३४०(२),२७८, ३ (५) सह औषधी द्रव्य व सौंदर्यप्रसाधन अधिनियम १९४० चा कलम १७ (ब) नुसार वालीव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आल्याची माहिती औषध निरीक्षक सतीश चव्हाण यांनी सांगितले आहे.




### पालिकेकडून तपासणी केल्याचा दावा

**वसई विरार महापालिकेच्या आरोग्य केंद्रात जो औषध साठा येतो. त्याची तपासणी करूनच चेतली जात आहे. औषधांच्या संदर्भातील प्रमाणपत्र, पुरवठा दार यांची कागदपत्रे, औषधांची माहिती अशा सर्व बाबी तपासून घेतल्या जात असल्याचा दावा महापालिकेच्या मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ भक्ती चौधरी यांनी केला आहे. तसेच ज्या प्रमाणे तक्रारी येतील त्यानुसार महापालिका तपासणी करीत आहे असेही त्यांनी सांगितले आहे.**




# इरादा पत्र दिले; पण भूखंड कधी ?

## सिडको प्रकल्पग्रस्तांना भूखंडाची प्रतीक्षा

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**उरण :** सिडकोने ११ जूनला द्रोणागिरी येथील सेक्टर ६५ मध्ये भूखंडाची सोडत काढली आहे. तेथे कोणत्याही प्रकारच्या पायाभूत सुविधा नसल्याने इरादा पत्र दिले, विकसित भूखंड कधी देणार असा सवाल आता येथील प्रकल्पग्रस्तांकडून केला जात आहे. यापूर्वी सिडकोकडून २००८ साली म्हणजे १६ वर्षांपूर्वी ज्या शेतकऱ्यांना सोडतीमध्ये भूखंड इरादीत केले होते अशा प्रकल्पग्रस्तांना अद्याप भूखंडाचा ताबा मिळालेला नाही. यामुळे द्रोणागिरी सोडतीतील प्रकल्पग्रस्त भूखंड मिळण्याबाबत साशंक आहेत.

सिडकोने प्रकल्पासाठी आपल्या सर्व जमिनी संपादित केल्या आहेत. संपादित जमिनीच्या मोबदल्यासह साडेबारा टक्के विकसित भूखंड देण्याचे मान्य झाले आहे. त्याप्रमाणे काहींना ( ज्या प्रकल्पग्रस्तांनी बिल्डरसोबत व्यवहार केला आहे) देण्यात आले आहेत. परंतु २००८ साली ज्यांना सोडतीमध्ये भूखंड इरादीत झाले होते अशा ५८६ भूखंड धारकांना १६ वर्षांनंतरही सिडकोने पायाभूत सुविधा न केल्यामुळे भूखंडाचा ताबा मिळाला नाही.

दरम्यान, प्रकल्पग्रस्तांची आज बैठक यासंदर्भात चर्चा करण्यासाठी बुधवार २ जुलै २०२५ रोजी सायंकाळी ७.०० वा. कामगार भवन बोकडवीरा येथे प्रकल्पग्रस्तांच्या बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे. तरी प्रकल्पग्रस्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन रामचंद्र म्हात्रे, भूषण पाटील, हेमलता पाटील, भास्कर पाटील व पद्माकर पाटील यांनी केले आहे.

## कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण

शंकरराव चौक, कल्याण (प), जि. ठाणे- ४२१३०१,
सकेत स्थळ www.kdmc.gov.in दुरध्वनी क्र. ०२५१-२२०३६२१

### नगररचना विभाग

### -: जाहीर आवाहन :-

ज्याअर्थी, कल्याण - डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील शासनाचे नगर विकास विभागाने मंजूर केलेल्या विकास योजना नकाशांमध्ये मौजे ठाकूर्ली, गावदेवी, शिवाजीनगर, चोळे, कांचनगाव, कचोरे कल्याण, अटाळी व आंबिवली या गावांमधून ३०.०० मी. व ४५.००मी. रुंद बाहयवळण रस्ता (Ring Route) प्रस्तावित करण्यात आला आहे. उक्त रस्ता विकसित करणेकरीता कल्याण डोंबिवली महानगरपालिका नियोजन प्राधिकरण' आहे.

ज्याअर्थी, बाहयवळण रस्त्याने बाधीत होणाऱ्या जागेची उप अधिक्षक भूमी अभिलेख, कल्याण यांचेकडून संबंधित कार्यालयाचे प्रतिनिधींच्या उपस्थितीत संयुक्त मोजणी करुन आखणी निश्चित करण्यात आलेली असून कल्याण डोंबिवली महानगरपालिका व मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांचे संयुक्त विद्यमाने उक्त ३०.०० मी. व ४५.०० मी. रुंद बाहयवळण रस्ता विकसित करण्याचे काम सुरु आहे. तसेच सदरहू रस्त्याने बाधीत होणाऱ्या क्षेत्राचे संपादन करणे अनुषंगाने उप अधिक्षक भूमी अभिलेख, कल्याण यांचेकडून प्राप्त जमिनीचे विवरण खालील तत्क्यामध्ये नमूद केलेले आहे.

तरी या जाहीर सूचनेद्वारे सूचित करण्यात येते की, उक्त रस्त्याच्या रुपरेषेमध्ये ज्यांची जमीन बाधीत होत आहे, अशा जमीन मालकांनी रस्त्याने बाधीत होणाऱ्या क्षेत्राचे हस्तांतरणीय विकास हक्क (TDR) मिळणेसाठी ७/१२ उतारा व इतर अनुषंगिक आवश्यक कागदपत्रांसह कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या नगररचना विभागाकडे आपले प्रस्ताव लवकरात लवकर सादर करणेकामी आवाहन करण्यात येत आहे. प्राप्त प्रस्तावांवर महानगरपालिकेकडून हस्तांतरणीय विकास हक्कांच्या प्रस्तावांबाबत एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली मधील विनियम क्र. ११.२ अनुषंगाने कार्यवाही करण्यात येईल. अन्यथा सदर रस्त्यामध्ये बाधीत होणारे क्षेत्र महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम १२५ नुसार संपादीत करणेकामी महानगरपालिकेडून आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल.

तरी सदरहू रस्त्याने बाधीत होणाऱ्या क्षेत्राचे हस्तांतरणीय विकास हक्काचे मोबदल्यात भूसंपादन करणेकामी संबंधितांनी महापालिकेस सहकार्य करावे. सदर बाबत अधिकच्या माहिती करीता श्री. सं. ना. डोईफोडे, सहाय्यक संचालक, नगररचना (मो.क्र. ९०९६३०३८५२), श्री. सुरेंद्र टेंगळे, नगररचनाकार (मो.क्र. ७९७७२१७६७२), श्री. शशीम केदार (मो.क्र. ९८२०२८०८१३) व श्री. सचिन घुटे (मो.क्र. ९९६७२८१४८६) या महापालिका अधिकाऱ्यांशी संपर्क साधावा. सदर रस्त्याच्या मंजूर विकास योजनेचा नकाशा महापालिकेच्या नगररचना विभागात अवलोकनार्थ उपलब्ध आहे.

तसेच कल्याण डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील Segment - III व V, ३०.०० मी. व ४५.०० मी. रुंद बाहयवळण रस्त्याने बाधीत जमीनींचे भूसंपादन करणे आवश्यक असलेल्या जमीनीचा तपशील व ७/१२ धारकांचा तपशील महानगरपालिका मुख्यालय, महापालिकेचे प्रभाग कार्यालय यांच्या नोटीस बोर्डावर तसेच महापलिकेच्या संकेत स्थळ www.kdmc.gov.in वर अवलोकनासाठी उपलबध आहे.

जावक क्रमांक :
कडोंमपा/जसवि/मुका/२५१
दिनांक : ०२ जुलै २०२५

सही/-
(सं.ना. डोईफोडे)
सहाय्यक संचालक नगररचना कल्याण
डोंबिवली महानगरपालिका, कल्याण

# मिरा भाईदरच्या पुनर्विकासात अडथळे

## जन जागृतीसाठी शासकीय अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत मार्गदर्शन शिबीर

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**भाईंदर :** मिरा भाईंदर शहरातील जुन्या इमारतींच्या पुनर्विकासात मोठे अडथळे निर्माण होत आहेत. त्यामुळे नागरिकांना जागरूक करण्यासाठी नुकतेच शासकीय अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत एक मार्गदर्शन शिबिर पार पडले. यावेळी उपस्थित अधिकाऱ्यांनी पुनर्विकास करण्यासाठी आवश्यक असलेल्या महत्त्वपूर्ण बाबींची माहिती नागरिकांना देण्यात आली.

मिरा भाईंदर शहरात ३० वर्षांहून अधिक जुन्या अनेक इमारती आहेत. या इमारती धोकादायक अवस्थेत जात असल्यामुळे त्यांचा पुनर्विकास करणे आवश्यक बनले आहे. मात्र पुनर्विकासाच्या प्रक्रियेत अनेक अडथळे निर्माण होत आहेत. यामध्ये विकासकांकडून फसवणूक, आवश्यक कागदपत्रांची अपूर्णता आणि सोसायटीतील अंतर्गत वाद हे मुख्य अडथळे ठरत आहेत. या समस्यांना मार्गदर्शन मिळावे म्हणून मिरा भाईंदर शहराचे आमदार नरेंद्र मेहता यांच्या पुढाकाराने रविवारी "इमारती पुनर्विकास मार्गदर्शन शिबिर आयोजित करण्यात आले होते. या शिबिरात सोसायटी पदाधिकाऱ्यांच्या तक्रारी थेट संबंधित अधिकाऱ्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी महसूल विभागाच्या नायब तहसीलदार पौर्णिमा गुरव, जिल्हा उपनिबंधक किशोर मांडे, उपनिबंधक अधिकारी किशन रत्नाळे आणि महापालिकेचे सहाय्यक संचालक नगररचनाकार पुरुषोत्तम शिंदे हे एकाच मंचावर उपस्थित होते.

शिबिरात उपस्थित नागरिकांनी पुनर्विकास प्रक्रियेत येणाऱ्या विविध अडचणी मांडल्या. त्यामध्ये कन्व्हेन्स व डिम्ड कन्व्हेन्स प्रक्रियेतील अडथळे, ७९अ प्रक्रियेदरम्यान निर्माण होणाऱ्या अडचणी, सात-बाऱ्यावर सोसायटीचे नाव चढवण्यास होणारा विलंब, तसेच पुनर्विकासाच्या दरम्यान सोसायटीतील वाद यांचा समावेश होता. या सर्व बाबींवर अधिकाऱ्यांकडून सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.

# रांजनोलीत शिधावाटपाचा काळाबाजार

## कोनगाव पोलीस ठाण्यात तिघांविरोधात गुन्हा दाखल

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** भिवंडी येथील रांजनोली भागात शिधावाटपाचा काळाबाजार केल्याप्रकरणी तिघांविरोधात गुन्हा दाखल झाला. दुकानदार पियुश ठक्कर, रमेश भानुशाली आणि ट्रक चालक रविकिशन सिंग यांच्याविरोधात कोनगाव पोलीस ठाण्यात गुन्हे अन्वेषण शाखेने दिलेल्या तक्रारीनंतर गुन्हा दाखल झाला. शिधापत्रिका धारकांना वाटप केले जाणारे अन्नधान्य योग्य पद्धतीने वितरित करण्याऐवजी त्याचा काळा बाजारात विक्री करण्यासाठी एक ट्रक रांजनोली भागातून जात असल्याची माहिती गुन्हे अन्वेषण शाखेच्या भिवंडी पथकाला मिळाली होती. त्यानंतर पोलिसांनी तो ट्रक अडविला.

ट्रकमध्ये एक लाख ४९ हजार रुपये किमतीचे अन्नधान्य आढळून आले. याप्रकरणी कोनगाव पोलीस ठाण्यात रविकिशन, पियुश आणि रमेश या तिघांविरोधात भारतीय न्याय संहितेचे कलम ३१८ (४), ३ (५) सह जीवनावश्यक वस्तू कायदा १९५५ चे कलम ३,७,९ प्रमाणे गुन्हा दाखल झाला आहे.

# ठाणे महापालिकेचा सेंद्रिय शेती प्रकल्प जनतेसाठी खुला



- उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची संकल्पना
- पातलीपाडा येथे दीड एकर क्षेत्रात सेंद्रिय शेती

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे (०२) :** उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या संकल्पनेतून साकारलेला ठाणे महानगरपालिकेचा पातलीपाडा येथील सेंद्रिय शेती प्रकल्प कृषी दिनाच्या निमित्ताने सर्वसामान्य नागरिकांसाठी खुला करण्यात आला आहे. महापालिकेच्या उद्यान विभाग आणि वृक्ष प्राधिकरणातर्फे या प्रकल्पाचे काम एप्रिल-२०२५मध्ये सुरू करण्यात आले होते.

ठाणे महापालिकेतर्फे फेब्रुवारी महिन्यात आयोजित करण्यात आलेल्या वृक्षवल्ली प्रदर्शनाचे उद्घाटन करताना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ठाणे महापालिकेने नागरिकांना आदर्श म्हणून सेंद्रिय शेती प्रकल्प करण्याचे निर्देश दिले होते. त्यानुसार, महापालिका आयुक्त सौरभ राव यांच्या मार्गदर्शनाखाली उद्यान विभागाने पातलीपाडा येथे सुमारे दीड एकर क्षेत्रात हा प्रकल्प विकसित केला आहे.

या प्रकल्पाचे काम एप्रिल-२०२५ मध्ये सुरू झाले. महाराष्ट्र कृषी दिनाचे औचित्य साधून त्याचे अनौपचारिक लोकार्पण करण्यात आले. आता हा प्रकल्प सर्व नागरिकांसाठी खुला असल्याची माहिती उद्यान अधिक्षक केदार पाटील यांनी दिली. या प्रकल्पाचे पूर्ण व्यवस्थापन उद्यान विभागामार्फत करण्यात येत आहे. सेंद्रिय शेती प्रकल्पामुळे विद्यार्थी व नागरिकांना नैसर्गिक शेती, पिके, भाजीपाला, फळझाडे, सेंद्रिय खताचा वापर आणि पाण्याचे योग्य व्यवस्थापन यासंबंधी माहिती व प्रत्यक्ष अनुभव मिळणार आहे. तसेच, शेतीचे महत्त्वही समजून घेता येईल, असेही पाटील यांनी सांगितले.

### प्रकल्पात काय?

या प्रकल्पात, विविध प्रकारचा भाजीपाला व पालेभाज्यांची लागवड करण्यात आली आहे. त्यात, वांगी, भेंडी, टोमॅटो, मका, मिरची, ढोबळी मिरची, हिरवा व लाल कोबी, भुईमूग, रताळे, सुरण, लाल माठ, मेथी, कारले, दोडका, शिराळी, भोपळा अशा वेलवर्गीय भाज्या यांचा समावेश आहे. तसेच, दोन प्रकारचे तांदूळ व नाचणीचे उत्पादनही घेतले जात आहे. तर, फळझाडांमध्ये आंबा, लिंबू, चायनीज लिंबू, अॅवेकॅडो, अंजीर, केळी, सिताफळ, लक्ष्मणफळ, डाळिंब, बुटका नारळ आदी झाडांची लागवड करण्यात आली आहे.

प्रकल्प क्षेत्रात कृत्रिम तलाव तयार करून त्यामध्ये वॉटर लिली व मासे सोडण्यात आले आहेत. भविष्यात या प्रकल्पामध्ये कोंबड्या, गाई, शेळ्या, टर्की व बदक पालन यांचा समावेश करण्याची योजना आहे.

### सेंद्रिय उत्पादने अनाथाश्रम व वृद्धाश्रमांना देणार

ठाणे महापालिकेच्या हा उपक्रम समजोपयोगी व्हावा यासाठी या शेतामध्ये तयार होणारी सेंद्रिय उत्पादने अनाथाश्रम व वृद्धाश्रम यांना देण्यात येणार आहे. पातलीपाडा सेंद्रिय शेती प्रकल्प हा सर्वार्थाने, पर्यावरणपूरक, शैक्षणिक आणि सामाजिक दृष्टिकोनातून महत्त्वाचा उपक्रम ठरणार असल्याचा विश्वास ठाणे महापालिकेच्या उद्यान विभाग व वृक्ष प्राधिकरणास आहे.

### नागरिकांसाठी खुले

पातलीपाडा येथील महापालिकेच्या या सेंद्रिय शेती प्रकल्पास सोमवार ते शनिवार स. १० ते सायं. ५. या वेळेत नागरिकांना भेट देता येईल. शाळांना विद्यार्थी भेटींचेही आयोजन करता येणार आहे.

# पनवेल - डहाणू शटलला सापत्न वागणूक

## संतप्त प्रवाशांचा भिवंडीत उद्रेक ■ रेल्वेकडून आंदोलकांवर गुन्हे दाखल

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी :** पनवेल - डहाणु मेमु शटल भिवंडी रोड रेल्वे स्थानकात मंगळवारी रात्री अर्धा तासाहून अधिक काळ रोखून धरणाऱ्या ६८ प्रवाशांच्या विरोधात रेल्वे सुरक्षा बळाच्या जवानाने मंगळवारी डोंबिवली लोहमार्ग पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला. ही मेमु गाडी नेहमीच उशिरा धावते. लांब पल्ल्याच्या गाड्या या गाडीच्या पुढे काढल्या जातात, असे आरोप आंदोलनकर्त्या प्रवाशांकडून करण्यात येत होते. रेल्वे सुरक्षा बळाच्या जवानांनी आंदोलनकर्त्या प्रवाशांना आपण




आपले म्हणणे रेल्वे स्थानक व्यवस्थापक यांना सांगा. त्यांच्या तक्रारी नोंदीत तक्रार करा, असे सांगून रेल्वे रूळातून प्रवाशांना बाजुला होण्यास सांगत होते. पण प्रवासी बाजुला हटण्यास तयार नव्हते. त्यामुळे रेल्वे सुरक्षा बळाच्या जवानांनी प्रवाशांविरुध्द गुन्हा दाखल केला.

भिवंडी रोड रेल्वे स्थानकात ही गाडी ८.०५ वाजता येणे अपेक्षित होते. ही गाडी भिवंडी रेल्वे स्थानकात रात्री ९.०८ वाजता आली. गाडी एक तास उशिरा आल्याने प्रवाशांच्या संतापाच उद्रेक झाला. ही गाडी पनवेलहून सुटल्यावर या गाडीच्या अगोदर लांब पल्ल्याच्या गाड्या काढल्या जातात. ही गाडी बाजुला उभी केली जाते. त्यामुळे या गाडीला डहाणु येथे जाण्यास नेहमी विलंब होतो, असे आरोप करत प्रवाशांना पनवेल डहाणु मेमू शटल समोर ठिय्या मांडला.

रेल्वे सुरक्षा बळाच्या जवानांनी प्रवाशांना रेल्वे मार्गातून हटविण्याचा प्रयत्न केला. ते हटण्यास तयार नव्हते. आपण आपले म्हणणे रेल्वे स्थानक व्यवस्थापक यांना सांगा असे सांगुनही प्रवासी ऐकत नव्हते. ६० पुरूष सात महिला या आंदोलनात सहभागी झाल्या होत्या. ही गाडी उशिरा धावत असल्याने आम्हाला नेहमीच घरी जाण्यास उशीर होतो. आमची घरे रेल्वे स्थानकापासून खेडेगावात आहेत. त्यामुळे बस, खासगी वाहने निघून गेलेली असतात, अशा तक्रारी प्रवाशांनी केल्या.

अखेर रेल्वे सुरक्षा बळाच्या जवानांच्या यशस्वी प्रयत्नानंतर रेल्वे मार्गातून प्रवासी रात्री ९.४५ वाजता बाजुला झाले. प्रवासी बाजुला झाल्यानंतर पनवेल डहाणू मेमू शटल डहाणुच्या दिशेने रवाना झाली. प्रवाशांनी अडथळा आणल्याने डहाणू शटल अर्धा तास भिवंडी रोड रेल्वे स्थानकात खोळंबली. त्यामुळे रेल्वे सुरक्षा बळाच्या जवानांनी आंदोलनकर्त्या प्रवाशांविरुध्द डोंबिवली रेल्वे स्थानकात गुन्हा दाखल केला आहे.

# लंडनच्या बाजारपेठेत बदलापूरची जांभळे

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**बदलापूर :: प्रतिनिधी**

कर्नाटक येथील 'अपेडा' संस्थेमार्फत यंदा प्रथमच भारतीय जांभळे लंडनच्या बाजारपेठेत पोहोचली असून, त्यात दोन वर्षांपूर्वी भौगौलिक मानांकन मिळालेल्या बदलापूरच्या जांभळांचाही समावेश आहे. 'या हंगामात दोन क्विंटल जांभळे युरोपमध्ये पोहोचली. मागणीपेक्षा हा पुरवठा कमी होता, पण पुढील वर्षी मोठ्या प्रमाणात जांभळांची निर्यात होईल,' असा विश्वास बदलापूर जांभूळ परिसंवर्धन केंद्राचे आदित्य गोळे यांनी व्यक्त केला.

यंदा मे महिन्यातच पावसाचे आगमन झाल्याने बदलापूर परिसरातील जांभळांचे पीक मोठ्या



प्रमाणात वाया गेले. तरीही देशातून पहिल्यांदाच युरोपमध्ये निर्यात होणाऱ्या जांभळांमध्ये बदलापूरच्या जांभळांचाही समावेश होता. त्यामुळे स्थानिक जांभूळ उत्पादक शेतकऱ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे. केंद्रीय वाणिज्य मंत्री पियूष गोयल यांनीही जांभूळ सातासमुद्रापार पोहोचल्याबद्दल संबंधितांचे अभिनंदन केले आहे.

बदलापूरच्या जांभळांना भौगोलिक मानांकन मिळाल्यानंतर परिसंवर्धन ट्रस्टच्या वतीने आता अधिक प्रमाणात जांभळांचे उत्पन्न घेण्याचे प्रयत्न सुरू आहेत. त्यासाठी दरवर्षी जांभळांच्या रोपांची लागवड केली जात आहे. सर्वसाधारणपणे मेच्या अखेरीस आणि जून महिन्यात जांभळे पिकतात. याच काळात पावसाचे आगमन होते. वादळवारा आणि पावसामुळे जांभळे झाडावरून पडून वाया जातात. यंदा या लहरी हवामानाचा फटका जांभूळ पिकाला बसला. मे महिन्यात मुसळधार पाऊस पडल्याने हातातोंडाशी आलेली जांभळे वाया गेली. त्यामुळे स्थानिक शेतकऱ्यांना अपेक्षित उत्पन्न मिळाले नाही



दैनिक ठाणे
जीवनदीप वार्ता
ठाणे ■ गुरुवार
■ ०३ जुलै २०२५
jeevandeepvartanews2020@gmail.com



# आषाढीनिमित्त ठाणे विभागाकडून पंढरपूरला एसटीच्या जादा गाड्या



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे – आषाढी एकादशीनिमित्त विठ्ठलाच्या दर्शनासाठी पंढरपुरात जाणाऱ्या नागरिकांची संख्या लक्षात घेऊन महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या ठाणे विभागाकडून पंढरपुरकरिता जादा गाड्यांचे नियोजन करण्यात आले आहे. ठाणे विभागाकडून ४ जुलै आणि ५ जुलै या दोन दिवशी एकूण १६ गाड्या पंढरपुरसाठी रवाना होणार असून या गाड्या अपुऱ्या पडल्यास आणखी अतिरिक्त गाड्या सोडणार असल्याची माहिती एसटी महामंडळाच्या ठाणे विभागाकडून देण्यात आली. आषाढी एकादशीसाठी पंढरपूरला जाण्याकरिता दरवर्षी एसटी महामंडळाकडून जादा गाड्यांचे नियोजन केले जाते. यंदाच्या वर्षी ६ जुलै ला आषाढी एकादशी आली आहे. आषाढी एकादशीच्या दिवशी भाविकांना पंढरपुरात जाता यावे यासाठी एसटी महामंडळ सज्ज झाले आहे. भाविकांचा प्रवास सुरक्षित आणि सुखकर व्हावा यासाठी एसटी महामंडळाच्या ठाणे विभागाकडून जुलै महिन्याच्या पहिल्या आठवड्यापासून जादा गाड्या उपलब्ध केल्या आहेत.

## रोटरी क्लबच्या माध्यमातून मुरबाडमधील शाळेला नवं रूप !

● दै. ठाणे जीवनदीप वार्ता ●



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुरबाड :: दिलीप पवार**

शंभर वर्षापेक्षा अधिक जुन्या असलेल्या जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा मुरबाड नंबर एक येथे निधी अभावी शाळेची दुरावस्था पाहायला मिळत होती. ही परिस्थिती बदलण्यासाठी आणि शाळेची पटसंख्या वाढावी, मुलांना शिकण्यासाठी आनंददायी वातावरण मिळावे, यासाठी शाळेतील उत्साही शिक्षकांनी व मुरबाड पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी संजय थोरात व केंद्रप्रमुख सौं भावना गोरुले यांनी रोटरी क्लबच्या माध्यमातून, मुरबाड शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी असणाऱ्या मुरबाड नंबर एक शाळेत विविध विद्यार्थी उपयोगी सुविधा उपलब्ध करून आनंददायी वातावरण निर्मिती केली आहे.

रोटरी क्लबच्या माध्यमातून मुरबाड नंबर एक शाळेत संपूर्ण इमारतीची आकर्षक रंग रंगोटी, सुंदर व स्वच्छ स्वच्छतागृह, भव्य दिव्य सभागृह, विद्यार्थ्यांना खेळण्यासाठी विविध मैदाने व खेळाचे साहित्य, विद्युतीकरण पंखे यामुळे शाळेतील विद्यार्थ्यांमध्ये व पालकांमध्ये उत्साह दिसून येत आहे.

याचाच परिणाम सन 2025 26 या शैक्षणिक वर्षात शाळेची पटसंख्या वाढताना दिसून येत आहे. शाळेत निर्माण झालेल्या आनंददायी व उत्साही वातावरणाने विद्यार्थ्यांसह पालकांचाही शाळेबद्दल विश्वास वाढला आहे. विद्यार्थीही आनंदाने शाळेत येऊ लागले आहे. त्यामुळे शाळेकडे व शिक्षकांकडे पालकांचा व समाजाचा बघण्याचा दृष्टिकोन बदलला आहे.

यामुळे मुरबाड पंचायत समितीच्या गटविकास अधिकारी लता गायकवाड, गटशिक्षणाधिकारी संजय थोरात, केंद्रप्रमुख भावना गोरूले यांनी शाळेतील लता गायकवाड, शकीला पिरजादे, संतोष राहणे, युक्ता कोर या शिक्षकांचे कौतुक केले आहे.

## आषाढी निमित्त सेवा देणाऱ्या सर्व एसटी कर्मचाऱ्यांना मोफत भोजन व्यवस्था

### - परिवहन मंत्री प्रताप सरनाईक

● दै. ठाणे जीवनदीप वार्ता ●

**पेण :: धनाजी घरत**

आषाढी एकादशी निमित्त श्री. क्षेत्र पंढरपूर येथे विठुरायाच्या दर्शनासाठी येणाऱ्या लाखो भाविकांच्या सेवेसाठी एसटीच्या ५२०० बसेसची व्यवस्था केली आहे. ह्या बसेस घेऊन येणारे चालक, वाहक त्यांची देखभाल करणारे यांत्रिक कर्मचारी व या सर्वांना मार्गदर्शन करणारे पर्यवेक्षक व अधिकारी यांच्या चहा, नाश्ता व जेवणाची व्यवस्था मोफत करण्यात आली आहे. अशी माहिती परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली. मंत्री सरनाईक म्हणाले, गेली कित्येक वर्ष विठुरायाच्या भक्तांची सेवा एसटी व एसटीचे कर्मचारी सातत्याने करत आहेत. ऊन, वारा पाऊस याची तमा न बळगता अतिशय निष्ठेने त्यांचे कर्तव्य ते बजावत असतात. आषाढी वारीच्या काळात त्यांच्या जेवणाची आभाळ होऊ नये, म्हणून यंदा स्वखर्चाने मी सलग तीन दिवस या सर्वांच्या चहा, नाश्ता व जेवणाची व्यवस्था (एकादशीला उपवासाचे पदार्थ) करीत आहे. या निमित्ताने माणसातील " विठुराया" ची सेवा करण्याची संधी मला मिळत आहे. अर्थात, हे पुण्य पैशात मोजण्यासारखे नाही. त्यामुळे दरवर्षी अशा प्रकारचा उपक्रम मी राबवणार आहे. असे प्रतिपादन मंत्री सरनाईक यांनी यावेळी केले. आषाढी वारीच्या काळात ५ ते ७ जुलै रोजी चंद्रभागा बसस्थानक, भिमा बसस्थानक, विठ्ठल बसस्थानक व पांडुरंग बसस्थानक येथे सुमारे १३ हजार एसटी कर्मचारी या मोफत भोजन व्यवस्थेचा लाभ घेतील.

## टिटवाळ्यातील पत्रकाराला धमकावल्या प्रकरणी तिघांवर गुन्हा दाखल

● दै. ठाणे जीवनदीप वार्ता ●

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** पत्रकार अजय शेलार यांनी दिलेल्या तक्रारीनंतर कल्याण तालुका पोलीस ठाण्यात पत्रकार संरक्षण कायद्यांतर्गत तीन जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. विशेष म्हणजे हा कल्याण तालुका पोलिस ठाण्यात या कायद्यांतर्गत नोंदविण्यात आलेला पहिलाच गुन्हा ठरला आहे. १८ जून २०२५ रोजी शेलार यांनी "सरकारी मातीची खासगी विक्री" हि बातमी केली होती. त्यानंतर संदीप नाईक या इसमाने २७ जून रोजी फेसबुक लाईव्ह करून आपल्या सहकार्यांसमवेत शेलार यांना धमकी दिली, तसेच समाजमाध्यमांवर त्यांची बदनामी करण्याचा प्रयत्न केला होता. शेलार यांनी यासंदर्भात टिटवाळा येथील कल्याण तालुका पोलिस ठाण्यात लेखी तक्रार दाखल केली होती. त्यानंतर पोलीस प्रशासनाने तातडीने कारवाई करत, पत्रकार संरक्षण कायद्यांतर्गत गुन्हा दाखल केला. या गुन्ह्यात संदीप नाईक, आनंद कोल्हे व राजेश जाधव हे तिघे आरोपी आहेत. या प्रकरणाची माहिती गृह राज्यमंत्री, ठाणे ग्रामीणचे पोलिस अधीक्षक तसेच उपविभागीय पोलिस अधिकारी यांच्याकडेही देण्यात आली आहे.



### खासदार श्रीकांत शिंदे व आमदार राजेश मोरे यांच्या तर्फे

## भाल जिल्हा परिषद शाळेत मोफत वह्या वाटप

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**नेवाळी :** कल्याण श्री मलंग रोडवरील भाल येथील जिल्हा परीषद मराठी शाळेत दि २३ /६/२०२५ रोजी कल्याण चे कार्य सम्राट खासदार श्रीकांत शिंदे साहेब व कल्याण ग्रामीण चे आमदार राजेशजी मोरे साहेब यांच्या तर्फे गरीब गरजू विद्यार्थ्यांना मोफत वह्या वाटपाचा कार्यक्रम संपन्न झाला. या कार्यक्रमाचा भाल येथील मराठी शाळेतील २२९ विद्यार्थ्यांनी लाभ घेतला.

सदर कार्यक्रमाला सन्मानीय श्री मदन चिकणकर सर , पत्रकार नाना म्हात्रे, सामाजिक कार्यकर्ते भरत म्हात्रे ऋतिक म्हात्रे, राजन मढवी व शाळेतील शिक्षक वृंद उपस्थित होते या कार्यक्रमाला शिंदे गट शिवसेना शाखा प्रमुख धनेश म्हात्रे यांचे विशेष सहकार्य लाभले, शाळेच्या प्रभारी मुख्याध्यापिका आगवणे मॅडम यांनी उपस्थित मान्यवरांचे शाल व पुष्पगुच्छ देऊन आभार मानले.

## टिटवाळ्यात मुंबई-बडोदा महामार्गालगतच्या बेकायदा बांधकामांवर पालिकेची कारवाई



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण - टिटवाळा-मांडा गाव हद्दीतून गेलेल्या मुंबई-बडोदा महामार्गालगत भूमाफियांनी अडगळीच्या जागेत बेकायदा चाळींची उभारणी करण्यासाठी दहाहून अधिक जोत्यांची उभारणी केली होती. महामार्ग गावाजवळून जात असल्याने या भागातील मुख्य वर्दळीच्या जागा बेकायदा बांधकामे करून त्या हडप करण्याचा माफियांचा डाव होता, ही बाब कल्याण डोंबिवली पालिकेच्या अ प्रभागाचे साहाय्यक आयुक्त प्रमोद पाटील यांच्या निदर्शनास येताच त्यांनी तोडकाम पथकाच्या साहाय्याने बडोदा महामार्गालगतची जोते आणि चाळींची बांधकामे जमीनदोस्त केली.

टिटवाळा मांडा भागातून बडोदा-मुंबई महामार्ग जात आहे. या महामार्गामुळे टिटवाळा, खडवली भागातील जमिनींचे भाव वधारले आहेत. त्यामुळे या महामार्गालगतच्या सरकारी वन खात्याच्या जमिनी हडप करून तेथे बेकायदा चाळी उभारणीसाठी या भागातील भूमाफिया सरसावले आहेत. महामार्ग सुरू झाल्यानंतर अशाप्रकारची बांधकामे करता येणार नाहीत. आता पावसाळा सुरू आहे. मुसळधार पावसात पालिका, सरकारी अधिकाऱ्यांचे आपल्याकडे लक्ष नाही, असा समज करून घेऊन भूमाफियांनी टिटवाळा मांडा भागातील बल्याणी दफनभूमी परिसरातील मोकळया जागांवर शनिवार, रविवार शासकीय सुट्टीच्या दिवशी दिवसरात्र कामे करून बेकायदा चाळी, व्यापारी गाळे सुरू करण्यासाठी बेकायदा बांधकामांची उभारणी केली होती.

अशाप्रकारे जागा हडप करून तेथे हॉटेल, ढाबा, चहापानाच्या टपऱ्या सुरू करण्याची भूमाफियांची आखणी होती. पण अ प्रभागाचे साहाय्यक आयुक्त प्रमोद पाटील यांना मुंबई बडोदा महामार्गालगत बल्याणी दफनभूमी भागात भूमाफियांनी माळरान जमिनींवर, खाचर जमिनीत भराव करून जोत्यांची बेकायदा बांधकामे केली आहेत, अशी माहिती मिळाली. या माहितीची खात्री केल्यावर अशाप्रकारे बेकायदा बांधकामे दोन दिवसात बांधण्यात आली आहेत, अशी खात्रीलायक माहिती साहाय्यक आयुक्तांना मिळाली.

संबंधित बांधकामांच्या ठिकाणी जाण्यासाठी कच्चा रस्ता तयार करून त्या ठिकाणाहून जेसीबी आणि तोडकाम पथकाला नेऊन बल्याणी भागातील बडोदा महामार्गालगतची सर्व बेकायदा बांधकामे अ प्रभागाच्या तोडकाम पथकाने जमीनदोस्त केली. भूमाफियांचे तीस ते चाळीस लाख रूपयांचे नुकसान या तोडकामाच्या माध्यमातून करण्यात आले, अशी माहिती तोडकाम पथकाने दिली. ही कारवाई सुरू असताना एकही भूमाफिया कारवाई रोखण्यासाठी पुढे आला नाही. टिटवाळा परिसरातून मुंबई बडोदा महामार्ग गेला आहे. या महामार्गालगतच्या जमिनींना चांगले भाव आले आहेत. भूमाफिया या महामार्गालगत बेकायदा बांधकामे करण्यासाठी हालचाली करत आहेत. अशी कोणत्याही प्रकारची बांधकामे या महामार्गालगत आणि टिटवाळा परिसरात होऊ दिली जाणार नाहीत, अशी माहिती साहाय्यक आयुक्त प्रमोद पाटील यांनी दिली.

कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण

दुरध्वनी क्र. ०२५१-२२०३६२१

मालमत्ता विभाग

जाहिर निविदा सुचना क्र. ५ सन २०२५-२६

कल्याण डोंबिवली महानगरपालिकेतर्फे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ७९ अन्वयेच्या तरतुदीनुसार महानगरपालिकेच्या समावेशक आरक्षणाअंतर्गत महिला कल्याण केंद्र (WWC), व्यायामशाळा, शॉपिंग सेंटर या मालमत्ता १० वर्षेसाठी भाडेतत्वावर व्यक्तिंना / संस्थांना देणेबाबत.

१) निविदा विक्री दि. ०४/०७/२०२५ ते दि. २१/०७/२०२५ रोजी वेळ सायंकाळी ३.०० वाजेपर्यंत राहील.
२) निविदा स्विकृती दि. ०४/०७/२०२५ ते दि. २१/०७/२०२५ रोजी वेळ सायंकाळी ३.०० वाजेपर्यंत राहील.
३) निविदा पूर्व बैठक दि. ११/०७/२०२५ रोजी सकाळी ११.३० वाजता मा. उप आयुक्त (मालमत्ता) कल्याण डोंबिवली महानगरपालिका यांच्या दालनात घेतली जाईल.
४) शक्य झाल्यास दि. २२/०७/२०२५ रोजी सायंकाळी ३.०० वाजता ई-टेंडरींग विभाग नागरिक सुविधा केंद्र, येथ उघडयात येईल.
५) निविदा महापालिकेच्या www.mahatenders.gov.in या वेबसाईटवरुन विक्री व स्विकृती करता येतील.

सर्व निविदा किंवा कोणत्याही निविदा कोणतेही कारण न देता नाकारण्याचा अधिकार मा. आयुक्त, कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण यांनी राखुन ठेवला आहे

जावक क्रमांक :
कडोंमपा/जसवि/मुका/२५३
दिनांक : ०२ जुलै २०२५

सही /-
उप आयुक्त (मालमत्ता)
कल्याण डोंबिवली महानगरपालिका,
कल्याण

## जिल्हा माहिती कार्यालयाच्या छतावर वेस्ट टू बेस्ट संकल्पनेतून फुलले टेरेस गार्डन



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :: प्रतिनिधी**

WASTE TO BEST या संकल्पनेतून जिल्हा माहिती कार्यालयाच्या छतावर "TERRACE GARDEN" ही संकल्पना प्रत्यक्षात साकारण्यात आली आहे. या उपक्रमात प्रसारमाध्यम प्रतिनिधींच्याही हस्ते काही रोपे लावण्याचा मानस असून आज दि.3 जुलै 2025 रोजी जिल्हा माहिती कार्यालय, ठाणे येथे संध्याकाळी 4.00 वाजता वाजता हा संकप सिद्ध होणार आहे. ह्या पर्यावरणपूरक सामाजिक उपक्रमात सहभागी होण्याचे आवाहन जिल्हा माहिती अधिकारी मनोज सानप यांनी केले आहे.

ठाणे जिल्हा क्रीडा अधिकारी सुवर्णा बारटक्के, तालुका क्रीडा अधिकारी सायली जाधव आणि जिल्हा क्रीडा कार्यालयातील वरिष्ठ लिपिक रंगनाथ डुकरे यांनी आज जिल्हा माहिती कार्यालयातील टेरेस गार्डनला भेट दिली आणि "WASTE TO BEST" संकल्पना पर्यावरण तज्ञ श्री.विजयकुमार कट्टी यांच्याकडून समजून घेतली. यावेळी या संकल्पनेचा उपयोग जिल्हा क्रीडा कार्यालयाकडून जिल्हा क्रीडा संकुल, तालुका क्रीडा संकुल या ठिकाणी करण्याचा मानस त्यांनी व्यक्त केला.

कोकण विभागीय अधिस्वीकृती समितीचे अध्यक्ष आणि आपल्या ठाणे, नवी मुंबई तील ज्येष्ठ पत्रकार श्री.मनोज जालनावाला यांनी देखील या प्रकल्पास भेत देऊन जिल्हा माहिती कार्यालयचे कौतुक केले आहे.

## वाहतूक पोलिसांच्या कारवाईत सहा महिन्यात रिक्षा चालकांकडून १३ कोटी दंड वसूल

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** शहरात काही मुजोर रिक्षा चालकांच्या तक्रारी पोलिसांना प्राप्त झाल्यानंतर मागील सहा महिन्यात ठाणे वाहतुक पोलिसांनी नियमांचे उल्लंघन करणाऱ्या रिक्षा चालकांविरोधात दंडात्मक कारवाई करण्यास सुरुवात केली आहे. मागील सहा महिन्यात ठाणे वाहतुक पोलिसांनी १३ कोटी १५ लाख २२ हजार ३५० रुपये इतका दंड रिक्षा चालकांवर आकारला आहे.

एक लाख १० हजार ४७३ ई-चलानद्वारे ही कारवाई झाली असून अनेक रिक्षा चालकांवर चार ते पाच किंवा त्यापेक्षा जास्त चलान आहेत. रिक्षातून अधिक प्रवासी वाहतूक, रिक्षा थांबा सोडून प्रवासी वाहतूक करणे, बेदरकार रिक्षा चालवणे अशा प्रकारच्या कारवाईचा सर्वाधिक समावेश आहे. ठाणे, कळवा, मुंब्रा, दिवा, डोंबिवली, कल्याण, उल्हासनगर, अंबरनाथ, बदलापूर आणि भिवंडी ही शहरे ठाणे आयुक्तालय क्षेत्रात येतात. या शहरात सुमारे लाखभर रिक्षा आहेत. ठाणे जिल्ह्यातील अनेक ठिकाणी अनेक पर्यटन स्थळे, औद्योगिक क्षेत्र, गोदामे आणि लघु उद्योग आहेत. यामुळे पर्यटक, नोकरदार, व्यवसायिक हे या भागात शहरांत येत असतात.

## भिवंडीत 'लॉजिस्टीक हब' निर्मितीसाठी उच्चस्तरीय समिती – उद्योग मंत्री उदय सामंत

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी :: शरद भसाळे**

भिवंडी शहर व परिसरात लॉजिस्टीक व्यवसायाला अपार संधी आहेत. या परिसरातील लॉजिस्टीक उद्योगाचा विकास करणे आवश्यक आहे. रोजगाराच्या संधी यामधून निर्माण होतील. आशिया खंडातील सर्वात चांगला लॉजीस्टीक हब निर्माण होण्याची क्षमता भिवंडी शहर परिसरात आहे. येथील लॉजिस्टीक हबचा सुनियोजित विकास होण्यासाठी उच्चस्तरीय समितीची स्थापना करण्यात येईल अशी माहिती उद्योगमंत्री उदय सामंत यांनी दिली आहे.

भिवंडी पुर्वचे आमदार रईस शेख यांनी याबाबत प्रश्न चर्चा विधानसभे उपस्थित केली होती. यावेळी उद्योग मंत्री उदय सामंत यांनी सांगितले की भिवंडी परिसरातील पायाभूत सोयी सुविधांचा मोठ्या प्रमाणावर विकास करून या भागातील शक्तीकेंद्र असलेल्या लॉजिस्टीक हबचा विकास करता येईल. भिवंडीतील लॉजिस्टीक हबच्या विकासासाठी समितीने सूचीत केलेल्या शिफारशी नुसार धोरण ठरविण्यात येईलयाभागातील लोकप्रतिनिधींना यासाठी पुढाकार घेऊन लॉजिस्टीक हबच्य निर्मितीत सहकार्य करावे असेही मंत्री सामंत यांनी सांगितले.




## राज्यातील विनाअनुदानित शाळांना टप्प्याटप्प्याने अनुदान - उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई, दि. २ :** राज्यातील विनाअनुदानित शाळांना टप्प्याटप्प्याने अनुदान देण्याच्या निर्णयावर शासन ठाम असून, संबंधित शाळांनी विहित नियमांची पूर्तता केली असल्यास त्यांना लवकरच पुढील टप्प्याचे अनुदान देण्यात येईल, अशी माहिती उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विधानपरिषदेत दिली.

विधानपरिषद सदस्य किरण सरनाईक यांनी उपस्थित केलेल्या लक्षवेधी सूचनेला उत्तर देताना उपमुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले की, राज्यात पूर्वी अनेक शाळांना कायम विनाअनुदानित तत्वावर मान्यता देण्यात आली होती. मात्र, 2009 नंतर 'कायम' शब्द काढून टाकत टप्प्याटप्प्याने या शाळांना अनुदान देण्याचा मार्ग स्वीकारण्यात आला. 2016, 2018 आणि नंतर 2023 पर्यंत अनेक शाळांना अनुदान दिले गेले असून, आता पुढील टप्प्यातील शाळांसाठी 10 ऑक्टोबर 2024 रोजी बैठक घेण्यात आली आणि 14 ऑक्टोबर 2024 रोजी याबाबतचा शासन निर्णयही काढण्यात आला असल्याचे उपमुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी सांगितले. उपमुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले की, शाळांना एकाच वेळी संपूर्ण अनुदान देणे शक्य नसले, तरीही टप्प्याटप्प्याने अनुदान देण्याचे काम निश्चितपणे पूर्ण करू. मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि संबंधित विभागामध्ये चर्चा करून याबाबतचा लवकरच निर्णय घेतला जाईल, असेही उपमुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी सांगितले. राज्यमंत्री पंकज भोयर म्हणाले की, अनुदानाचा पुढील टप्पा देण्यास शासन कटीबद्ध असून त्यासाठी लवकरच आर्थिक तरतूद करण्यात येईल.

"ठाणे जीवनदीप वार्ता" हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक तथा संपादक श्री. रविंद्र नारायण घोडविंदे यांनी; महाराष्ट्र प्रिंटिंग प्रेस, हाऊस नंबर ८६२, उलनचाळ, अंबरनाथ (पश्चिम), जिल्हा - ठाणे, महाराष्ट्र - ४२१५०५ येथे छापून, एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ येथून प्रसिद्ध केले. (या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इत्यादींशी संपादक सहमत असतीलच असे नाही)
RNI No. MAH/MAR/2016/72091 ■ Postal Registration No. THC/256/2022-2024 (सर्व कायदेशीर न्यायनिवाडा मा.कल्याण सत्र न्यायालयात) कायदेविषयक सल्लागार - अॅड. जयकुमार ए. रिजवानी
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८/९०८२६ ६४७८१
E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com